<u>अतारांकित प्रश्नोत्तरांची पहिली यादी</u>

# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्प) अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**केंद्र शासनाच्या युडीएस या सर्वेक्षणानुसार राज्यात ६६ टक्के शिक्षक हे शैक्षणिक पात्रताधारक असल्याबाबत**

**(१) १२३५६ (२२-१२-२०१५). श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, ॲड.जयदेव गायकवाड, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या युडीएस या सर्वेक्षणानुसार राज्यात ६६ टक्के शिक्षक हे शैक्षणिक पात्रताधारक असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यात शिक्षण हक्क कायदा लागू झाल्यापासून ५ वर्षाच्या आत संबंधित प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांनी विहित केलेली शैक्षणिक पात्रता पूर्ण करणे आवश्यक असताना त्यानुसार किती शिक्षकांनी विहित केलेली शैक्षणिक पात्रता पूर्ण केली आहे व किती शिक्षकांनी ती पूर्ण केलेली नाही,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, ज्या शिक्षकांनी विहित केलेली शैक्षणिक पात्रता पूर्ण केलेली नाही त्या शिक्षकांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. विनोद तावडे (३०-१२-२०१६) :** (१), (२) व (३) राज्यातील प्राथमिक शाळेतील शिक्षकांपैकी ९८.८३% शिक्षक प्रशिक्षित आहेत व उच्च प्राथमिक शाळेतील शिक्षकांपैकी ९९.३१% शिक्षक प्रशिक्षित आहेत.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ मधील तरतूदीनुसार राज्यात सदर अधिनियमांची अंमलबजावणीकरिता पारित करण्यात आलेल्या अधिसूचनेच्या दिनांकापासून, कार्यरत अथवा नियुक्त अप्रशिक्षित शिक्षकांना ५ वर्षाच्या कालावधीत किमान अर्हता संपादन करणे आवश्यक आहे. सदर कालावधी दिनांक ०९०/२/२०१६ च्या शासन निर्णयान्वये दिनांक २८/०२/२०१९ पर्यंत वाढविण्यात आलेला आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात आदिवासी विद्यार्थी वसतिगृहांच्या संख्येत वाढ करण्याबाबत**

**(२) १५१७५ (२७-०४-२०१६). प्रा.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी विभागातर्फे विद्यार्थ्यांकरिता संपूर्ण राज्यात किती वसतिगृहे आहेत, त्यात विद्यार्थी संख्या किती आहे तसेच त्यातील प्रवेशप्रक्रिया कोणत्याप्रकारे (ऑनलाईन कि ऑफलाईन) राबविली जाते, त्यापैकी ऑनलाईन प्रक्रियेमध्ये काय त्रुटी आहेत,
(२) असल्यास, महसूल विभागस्तरावर वसतिगृह वाढविण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२८-१२-२०१६) :** (१) आदिवासी विकास विभागामार्फत अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांकरिता राज्यात एकूण ४९१ शासकीय वसतिगृहे कार्यरत आहेत. सदर वसतिगृहांची मंजूर क्षमता ५८४९५ इतकी आहे.

सन २०१३-१४ शैक्षणिक वर्षापासून वसतिगृह प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज पध्दती वापरण्यात येत आहे. वसतिगृह प्रवेशासाठी विद्यार्थ्यांची निवड गुणानुक्रमाने करण्यात येते.
(२) विभागाच्या कार्यरत वसतिगृहामध्ये प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी राज्यात १) महानगरे, २) इतर महसुली विभागीय शहरे व उर्वरित क महानगरपालिका क्षेत्र तसेच ३) जिल्हास्तर या ठिकाणच्या शैक्षणिक संस्थांमध्ये इयत्ता १२ वी नंतरचे उच्च शिक्षण घेणाऱ्या एकूण २०००० संख्येच्या मर्यादेत अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना निवास भोजन, शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन घेण्यासाठी विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न खात्यावर थेट रक्कम जमा करण्याबाबत दिनांक १५/१०/२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये "पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंयोजना" सुरु करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळाकडून कर्ज वाटपास विलंब होत असल्याबाबत**

**(३) १५२४० (२८-०४-२०१६). प्रा.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळाची समाजाच्या आर्थिक विकासाकरिता स्थापना केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१४-१५ व २०१५-१६ या आर्थिक वर्षात किती लाभार्थींनी अर्ज केले, त्यापैकी किती लाभार्थींना कर्ज वाटप झाले व त्याची रक्कम किती आहे, तसेच कर्जवाटप व मंडळातील कर्मचाऱ्यांच्या वेतनाची रक्कम किती आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०३-०१-२०१७) :** (१) होय, अनुसूचित जाती व नवबौध्द लोकांना स्वयंरोजगारासाठी अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने शासनामार्फत महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे.

(२) महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळास सन २०१४-१५ मध्ये १७१६८ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी ९६५८ लाभार्थींना एकूण रुपये १७०३.८५ लाख व सन २०१५-१६ मध्ये १७१७२ प्राप्त अर्जापैकी ९२०४ लाभार्थींना एकूण रुपये १६९६.४९ इतक्या रक्कमेचे कर्ज वाटप करण्यात आले आहे. तसेच, सन २०१४-१५ मध्ये एकूण रुपये १३.६५ कोटी व सन २०१५-१६ मध्ये एकूण रुपये ११.०१ कोटी इतकी रक्कम महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या वेतनवार खर्च करण्यात आली आहे.

(३) राष्ट्रीय महामंडळांकडून निधी प्राप्त न झाल्यामुळे राष्ट्रीय महामंडळाच्या योजनांतर्गत कर्जवाटपाबाबतची प्रकरणे प्रलंबित आहेत.

---

**राज्यात अनुसूचित जमातीतील महादेव कोळी जातीस**
**जात वैधता प्रमाणपत्र नाकारण्यात आल्याबाबत**

**(४) १५८७२ (२७-०४-२०१६). श्री.रामराव वडकुते, श्री.प्रकाश गजभिये, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनुसूचित जमाती जात पडताळणी समित्या अस्तित्वात आल्यापासून दिनांक २० ऑगस्ट, २०१५ पर्यंत ज्या आवेदनकर्त्यांच्या शाळा सोडल्याच्या दाखल्यावर कोळी या जातीची नोंद आहे अशा महादेव कोळी (एस.टी) या जातीस वैधता प्रमाणपत्र देण्याचे नाकारण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा प्रकरणांची एकूण संख्या किती आहे,

(३) असल्यास, अनुसूचित जमाती जात पडताळणी समित्या अस्तित्वात आल्यापासून दिनांक २० ऑगस्ट, २०१५ पर्यंत ज्या आवेदनकर्त्यांच्या शाळा सोडल्याच्या दाखल्यावर कोळी या जातीची नोंद असताना महादेव कोळी (एस.टी) या जातीचे वैधता प्रमाणपत्र देण्यात आले अशा प्रकरणाची एकूण संख्या किती आहे ?

**श्री. विष्णु सवरा (२४-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) महाराष्ट्र “महाराष्ट्र अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २०००, (२००१ चा महाराष्ट्र क्र. २३)” पारित करण्यात आलेला आहे व या अधिनियमाची अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने “महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २००३” हे दिनांक ०४/०६/२००३ अन्वये अस्तित्वात आलेले आहेत. सक्षम प्राधिकाऱ्यांकडून निर्गमित करण्यात आलेल्या प्रमाणपत्रांची वैधता अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती यांच्यामार्फत वरील अधिनियम/नियमातील तरतुदीनुसार करण्यात येते. याकरिता उमेदवाराने सादर करावयाची विविध कागदपत्रांची यादी सदर अधिनियम/नियमात नमूद करण्यात आली आहेत. सदर यादीनुसार अर्जदाराने सादर केलेली कागदपत्रे व पुरावे तसेच आवश्यकतेनुसार समितीने दक्षता पथकामार्फत केलेल्या तपासणीच्या आधारे समिती गुणावगुणानुसार निर्णय घेते.

---

**नांदेड जिल्हयातील शेतकऱ्यांच्या नावावर ठिंबक व तुषार संच उचलून केलेला गैरव्यवहार**

**(५) १९१४६ (२७-०४-२०१६). श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयात ठिंबक व तुषार संचाबाबत शेतकऱ्यांना माहिती नसल्याने एजंट व अधिकारी यांच्या संगनमताने उक्त शेतकऱ्यांच्या नावावर ठिंबक व तुषार संच घेऊन गैरव्यवहार झाल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (२८-१२-२०१६) :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**येवला (जि.नाशिक) येथे शासकीय वसतिगृह इमारतीच्या**
**बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत**

**(६) १९३३३ (१६-०८-२०१६). श्री.जयवंतराव जाधव : तारांकित प्रश्न क्रमांक १६४६३ ला दिनांक ३१ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) येथे आदिवासी विकास विभागाच्या मुले आणि मुलींच्या शासकीय वसतिगृह इमारतीच्या बांधकामास प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी आदिवासी विकास आयुक्तालयाने माहे मार्च, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त वसतिगृह इमारतींच्या बांधकामांना प्रशासकीय मान्यता देण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२८-१२-२०१६) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) येवला (जि.नाशिक) येथील मुले व मुलींच्या शासकीय वसतिगृह इमारतीच्या बांधकामास दिनांक १५/१०/२०१६ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील जमिनीच्या पुनर्मोजणी प्रकल्पांतर्गत सहा जिल्हयातील जमीन मोजणीसाठी रेकॉर्डचे डिजिटायझेशन करण्याबाबत

**(७) १९४२५ (१६-०८-२०१६). डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील जमिनीच्या पुनर्मोजणी प्रकल्पांतर्गत सहा जिल्हयातील जमीन मोजणीसाठी रेकॉर्डचे डिजिटायझेशन करण्याच्या निविदेचा प्रस्ताव भूमी अभिलेख विभागाने राज्य शासनाकडे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान मंजुरीसाठी पाठविला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोणत्या सहा जिल्हयातील जमीन मोजणीसाठी रेकॉर्डचे डिजिटायझेशन करण्यात येणार आहे व सदरहू प्रस्तावास केव्हापर्यत मंजूरी देण्यात येऊन अंमलबजावणी करण्यात येणार आहे,
(३) असल्यास, सदरहू कामाकरिता किती निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-१२-२०१६) :** (१), (२), (३) व (४) महसूल व वन विभागाच्या दिनांक ०६/१०/२०१५ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील ग्रामीण भागातील जमिनींची पुनर्मोजणी व नकाशांचे डिजिटायझेशन करण्यास मान्यता देण्यात आली असून पहिल्या टप्प्यात राज्याच्या प्रत्येक महसूली विभागातील एक जिल्हा याप्रमाणे पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर व रायगड या ६ जिल्ह्यांमध्ये ग्रामीण भागातील जमिनींच्या पुनर्मोजणीची कार्यवाही करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. सदर जिल्ह्यांमध्ये मूळ भूमापन नकाशांचे डिजिटायझेशनचे काम खाजगी संस्थामार्फत करण्यात येणार असून जमाबंदी आयुक्त, पुणे यांच्याकडून याबाबतची प्रारुप निविदा (RFP) शासनास सादर करण्यात आली असता त्यास उच्चाधिकार समितीची मान्यता घेऊन निविदा प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.

सदर बाबत मूळ भूमापन नकाशांचे डिजिटायझेशनचे काम डिजिटल इंडिया भूमि अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रम (DILRMP) या १००% केंद्र पुरस्कृत योजनेखाली होणार आहे. पहिल्या टप्प्यातील सहा जिल्हयांतील मूळ भूमापन नकाशांच्या डिजिटायझेशनच्या कामासाठी अंदाजे एकूण ४४.९७/- कोटी निधीची आवश्यकता असून त्याअंतर्गत एकूण १३ प्रकारच्या नकाशांचे डिजिटायझेशन करण्यात येणार आहे. केंद्र शासनाकडून गाव नकाशा व टिपण या दोन नकाशांचे डिजिटायझेशनसाठी १००% अनुदान प्राप्त होणार आहे. गाव नकाशांचे डिजिटायझेशन सन २००० मध्ये महाराष्ट्र सुदुर संवेदन उपयोजन केंद्र, नागपूर यांच्याकडून करण्यात आले असून टिपणांच्या डिजिटायझेशनसाठी रुपये ०४.३६/- कोटी निधी केंद्र शासनाकडून अपेक्षित आहे. तसेच उर्वरित ११ प्रकारच्या नकाशांचे डिजिटायझेशन करण्यासाठी रुपये ४०.६१/- कोटी निधीची आवश्यकता असून त्यासाठी राज्य शासन पुरक अनुदान उपलब्ध करुन देणार आहे. सदर कामाकरीता राज्य शासनाने सन २०१६-१७ च्या वार्षिक अंदाजपत्रकामध्ये रुपये ४.५०/- कोटी निधीची तरतुद केलेली आहे.

---

**नाशिक शहरातील भूमी अभिलेख विभागातील सनद व मालमत्ता पत्रकांवर प्रशासकीय यंत्रणेकडून जाणूनबुजून चुका करण्यात आल्याबाबत**

**(८) १९५२५ (१६-०८-२०१६). श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील भूमी अभिलेख विभागातील सनद व मालमत्ता पत्रकांवर शासकीय यंत्रणेकडून जाणूनबुजून चुका करण्यात आल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान जिल्हाधिकारी, नाशिक यांचेकडे व शासनाकडे तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शासकीय चुका दुरुस्त करण्यासाठी भूमी अभिलेख कार्यालयाकडून नागरिकांना आर्थिक व मानसिक त्रास दिला जात असल्याच्याही लोकप्रतिनिधींच्या तक्रारी आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-१२-२०१६) :** (१) अशी बाब आढळून आली नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालेगांव, बागलाण व देवळा तालुक्यात (जि.नाशिक) गिरणा नदीपात्रातुन अवैध वाळू उपसा होत असल्याबाबत**

**(९) १९६१७ (१६-०८-२०१६). डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक १८३११ ला दिनांक २८ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव, बागलाण व देवळा तालुक्यात (जि.नाशिक) गिरणा नदीपात्रातुन गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाळू चोरी रोखण्याकरीता गठीत करण्यात आलेल्या भरारी पथकांनी केलेल्या तपासणीत वाळू माफियांविरोधात गुन्हे दाखल करण्यात येवून दंड वसुली करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भरारी पथके गठीत करूनही तसेच वाळू माफियांवर कारवाई केल्यानंतरही कार्यवाही करूनही वाळूचोरीचे प्रकार सुरुच असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अमर्याद अवैध वाळु उपशामुळे नदीपात्रातील जलसाठा व भुजल पातळी घटून गिरणा नदी काठावरील गावांना पाणी टंचाई निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार मालेगांव, बागलाण व देवळा तालुक्यात गिरणा नदीपात्रातुन बैलगाडी, टेम्पोद्वारे सुरू असलेली वाळू उपसा रोखण्याबाबत तसेच वाळूमाफियांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-१२-२०१६) :** (१), (२), (३) व (४) मालेगांव, बागलाण व देवळा तालुक्यात (जि.नाशिक) गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुक रोखण्याकरीता दक्षता पथके गठित करण्यात आली आहेत. सदर दक्षता पथकांनी माहे एप्रिल, २०१६ पासून वाळूच्या अवैध उत्खनन व वाहतुकीच्या एकूण ४३ प्रकरणांमध्ये कारवाई करुन रुपये १७,००,८८८/- इतका दंड वसूल केला असून, १३ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. दक्षता पथक दररोज गस्ती घालत असून वाळूच्या अवैध उत्खनन व वाहतूकीवर नियंत्रण ठेवण्यात येत आहे.

वाळू उपशामुळे जलसाठा व भूजल पातळी घटून गिरणा नदी काठावरील गावांना पाणी टंचाई निर्माण होत असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महावितरणच्या नाशिक मुख्यालयाचे स्थलांतरण रद्द करण्याबाबत**

**(१०) १९६२१ (१६-०८-२०१६). श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक १५ ऑगस्ट, २०१६ पासून नाशिक येथील महावितरणचे मुख्यालय औरंगाबाद येथे स्थलांतर करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त स्थलांतराला नाशिक विभागातून लोकप्रतिनिधींनी व वीज ग्राहक संघटनांनी विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नाशिक येथील महावितरणच्या मुख्यालयाचे स्थलांतरण रद्द करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२७-१२-२०१६) :** (१) नाही.
(२) नाही.
(३) औरंगाबाद येथे महावितरणचे परिमंडळ कार्यालय अस्तित्वात असल्यामुळे नाशिक परिमंडळ कार्यालय औरंगाबाद येथे स्थलांतर करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**परभणी येथील जमिनीवरील बेकायदेशीर झालेले अतिक्रमण हटविण्याबाबत**

**(११) १९६९९ (१६-०८-२०१६). श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी शहरातील सर्व्हे ३१५ ते ३३० मधीलजवळपास २९ हे. ८९ आर (७५ एकर) जमिनीच्या बेकायदेशीर हस्तांतरणाबाबत जिल्हाधिकारी, परभणी यांनी सन २०१६ मध्ये वा त्यादरम्यान आदेश काढलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद यांनी सदरील जमिनीबाबत पुनर्निरीक्षण करून कारवाई करण्याबाबत जिल्हाधिकारी, परभणी यांना आदेशीत केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे हटवून जमीन ताब्यात घेण्याबाबत जिल्हाधिकारी, परभणी यांनी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-१२-२०१६) :** (१), (२) व (३) जिल्हाधिकारी, परभणी यांनी प्रश्नाधीन जमिनीच्या अनाधिकारे हस्तांतरणाबाबत निर्गमित केलेल्या दिनांक २२/०१/२०१६ रोजीच्या आदेशांविरुध्द मा.उच्च न्यायालय, मुंबई औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल झालेल्या रिट याचिका क्र.१३३८/२०१६ मधील दिनांक ०३/०२/२०१६ रोजी दिलेल्या आदेशात नमूद केल्यानुसार संबंधितांना म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली आहे. त्यानुसार संबंधितांनी त्यांचे लेखी म्हणणे सादर केले असून सुनावणीची प्रक्रिया सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**परभणी-हिंगोली जिल्हयातील गट सचिवांच्या मागण्याबाबत**

**(१२) १९७५० (१६-०८-२०१६). श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी-हिंगोली जिल्हयातील गट सचिवांच्या बदल्या, थकीत संवर्ग निधी, नवीन वेतन श्रेणी, नियमित वेतन, ग्रॅच्युइटी, थकीत इन्क्रीमेन्ट, फरकाची रक्कम व इतर मागण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २३ मार्च, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा. सहकार मंत्री यांच्याकडे लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०३-०१-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे. दिनांक ५ मार्च, २०१६ रोजीचे लेखी निवेदन प्राप्त झालेले आहे.

(२) यासंदर्भात चौकशी करण्यासाठी श्री.पी.एम.इजाते, विशेष लेखा परीक्षक वर्ग-२ सहकारी संस्था (कापूस) परभणी यांची नेमणूक केलेली आहे. त्यांचेमार्फत चौकशीची कार्यवाही चालू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे, कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, पालघर येथील विद्यार्थ्यांसाठी उपनगरात बालभवनचे उपकेंद्र सुरु करण्याबाबत**

**(१३) २००५३ (२३-०८-२०१६). श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील चर्नीरोड रेल्वे स्थानक परिसरात विद्यार्थ्यांच्या सुप्तशक्तीचा विकास करण्यासाठी महाराष्ट्र राज्य जवाहर बालभवन येथे विविध उपक्रम राबविले जात असून ठाणे, कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, पालघर आदी भागातील विद्यार्थ्यांना सदरहू बालभवन लांब पडत असल्याने शेकडो विद्यार्थी या उपक्रमांपासून वंचित राहिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जवाहर बालभवनाचे उपनगरात उपकेंद्र सुरू करून उपनगरातील विद्यार्थ्यांना उपक्रमांचा लाभ मिळावा यासाठी शिक्षक परिषदेचे अनिल बोरनारे यांनी मा.शालेय शिक्षण मंत्री यांचेकडे माहे एप्रिल २०१६ च्या पहिल्या पंधरवडयात लेखी निवेदन सादर करून मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू मागणीबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(४) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२८-१२-२०१६) :** (१) सदर उपक्रम उन्हाळी/दिवाळीच्या सुट्टीत राबविण्यात येत असल्याने ठाणे, कल्याण, नवी मुंबई, पालघर आदी भागातील विद्यार्थी कमी प्रमाणात उपक्रमात सहभागी होतात.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील मान्यता प्राप्त वसतिगृहातील अधीक्षकांना मानधन ऐवजी वेतनश्रेणी देणेबाबत**

**(१४) २००६९ (१६-०८-२०१६). डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक १४५९४ ला दिनांक १७ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सामाजिक न्याय विभागामार्फत चालविण्यांत येणाऱ्या मागासवर्गीय मुला-मुलींच्या मान्यता प्राप्त वसतिगृहातील अधीक्षकांना मानधनाऐवजी वेतनश्रेणी देण्याबाबतच्या विचाराधिन असलेल्या बाबींवर शासनाचा विचार पुर्ण झाला आहे काय,

(२) असल्यास, अत्यल्प मानधनावर कार्यरत अधीक्षकांना वेतनश्रेणी लागू करणे संदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२८-१२-२०१६) :** (१) व (२) मागासवर्गीय मुलामुलींच्या अनुदानित वसतिगृहातील अधीक्षक व कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी लागू करण्याबाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर अमान्य करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शबरी विकास महामंडळाने वाटप केलेल्या कर्जाची रक्कम वसूल करण्याबाबत**

**(१५) २०४४४ (१९-०८-२०१६). डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, ॲड.राहूल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अनिल भोसले, श्री.सतीश चव्हाण** : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शबरी विकास महामंडळाने सन २००१ ते २०१२ अखेरपर्यंत २०९ जणांना रुपये २४९.३२ लाख इतके कर्जवाटप केले, परंतु त्यातील १५७ व्यक्तींनी घेतलेल्या रुपये ९६.६९ लाख कर्जाची रक्कम अद्यापही अदा केली नसल्याचे तसेच सन २००९ ते २०१२ या कालावधीत ६९ व्यक्तींना १५२.६५ लाख इतके कर्ज वाटप करण्यात आले, परंतु त्यातील केवळ २३ व्यक्तींनी पाच लाख रुपये अदा केले असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कर्जवसूलीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२७-१२-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) १८७ व्यक्तिंनी कर्ज घेतले असून कर्ज वसूलीसाठी महामंडळाचे कर्मचारी कर्जदाराची प्रत्यक्ष भेट घेवून कर्ज भरणा करण्याबाबत सूचना देतात व त्यांना नोटीस पाठविण्यात येते. वसूलीबाबत आगावू धनादेश घेतलेले असतात. ते बँकेत जमा करण्यात येवून ते न वटल्यास न्यायालयात दावे दाखल करून कर्ज वसूली करण्यात येते. अन्यथा वस्तू जप्त केल्या जातात. (उदा.वाहन)

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात उन्हाळी सुट्टयात दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना पोषण आहार देण्याबाबत

**(१६) २०४४५ (२३-०८-२०१६). श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उन्हाळी सुट्टयातही दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना पोषण आहार द्या, अशा सूचना शिक्षण विभागाने दिल्या आहेत मात्र प्राथमिक शिक्षण संचालकाकडून पोषण आहार देण्यासंबंधीचे पत्र आले नसल्याचे माहिती प्राथमिक स्तरावरील अधिकारी देत असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाळांना सुट्टया लागून १५ दिवस उलटले तरी संबंधित विभागाने शिक्षणाधिकारी यांना शालेय पोषण आहार पुरविण्यासंबंधिचे पत्र शिक्षणाधिकाऱ्यांना दिले असल्याचे सांगत असून अधिकाऱ्यांच्या या टोलवाटोलवी उत्तरामुळे दुष्काळग्रस्त शाळेकरी मुलांचा आहार प्रलंबित असून त्यांची गैरसोय होऊ नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०५-०१-२०१७) :** (१) व (२) शालेय पोषण आहार या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार राज्यातील टंचाईसदृश भागात उन्हाळी सुट्टीमध्ये पात्र विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार उपलब्ध करुन देण्याबाबतच्या सुचना प्राथमिक शिक्षण संचालनालयामार्फत दिनांक २८/०४/२०१६ च्या पत्रान्वये दिलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### करंजा (जि.रायगड) येथील मासेमारी बंदर विकासाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(१७) २१०५३ (१६-०८-२०१६). श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.ख्वाजा बेग : तारांकित प्रश्न क्रमांक ४५८५ ला दिनांक १७ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील ससून डॉकला पर्याय म्हणून रायगड जिल्ह्यातील करंजा येथे मासेमारी बंदर विकसित करण्यास शासनाने मंजूरी दिल्यानंतर माहे नोव्हेंबर, २०१२ पासुन सुरु करण्यात आलेले काम मागील ३ वर्षापासून संपूर्णत: ठप्प झालेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मत्स्यबंदर विकासाच्या प्रकल्पांतर्गत योजिलेल्या एकूण कामापैकी किती व कोणकोणती कामे आजमितीस पूर्ण झालेली आहेत, तसेच या प्रकल्पांतर्गत आतापर्यंत पूर्ण झालेल्या कामांवर एकूण किती रक्कम खर्च करण्यात आलेला आहे, प्रकल्पाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, सदरहू प्रकल्पाचे काम रखडलेले असल्याने आजही रायगड मधील मच्छीमारांना ससून डॉकवर अवलंबून राहावे लागत असून करंजा येथील मासेमारी बंदर विकासाचे ठप्प झालेले काम विनाविलंब हाती घेवून ते लवकरात लवकर कार्यान्वित होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.महादेव जानकर (०९-०१-२०१७) :** (१) होय.

(२) सदर कामास सन २०१२ मध्ये सुरुवात करण्यात आली आहे. मार्च, २०१३ पर्यंत ४७५ मीटर लांबीचे ब्रेकवॉटरचे काम पूर्ण करण्यात आले आहे. या कामावर रुपये ८४९.१७ लक्ष इतका खर्च झालेला आहे. बंदरामध्ये खोदाईचे काम करताना मातीच्या ठिकाणी खडकाचा भूस्तर आढळून आला. त्यामुळे दिनांक १५ ते १९ एप्रिल, २०१३ च्या दरम्यान करंजा येथे CICEF यांचे समवेत संयुक्तीक चाचणी छिद्रे घेण्यात आली. करंजा येथील ट्रायल बोअरच्या अहवालानुसार नियोजित ठिकाणी Weathered rock मिळाला. त्यामुळे सदरचे काम बंद करण्यात आले आहे.

(३) बंदराच्या नियोजित ठिकाणी खडक मिळाला. त्यामुळे खडक फोडून तेथे बांधकाम करावयाचे आहे. खडक फोडण्याच्या कामासाठी होणारा खर्च अंदाजपत्रकात नसल्यामुळे खडक फोडण्याचे व इतर अनुषंगीक खर्च विचारात घेता अंदाजपत्रकाच्या किंमतीमध्ये वाढ झाली. त्यामुळे मुख्य अभियंता, विशेष प्रकल्प सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी रुपये १५३.९६ कोटी इतक्या सुधारीत अंदाजपत्रक व आराखडा मान्यतेसाठी सादर केला असून सदर किंमतीस शासन निर्णय कृषि व पदुम विभाग, क्रमांक : मत्स्यवि-१५१४/प्र.क्र.१७०/पदुम-१४, दिनांक १ डिसेंबर, २०१६ अन्वये सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबईतील तीन्ही वीज कंपन्यांच्या वीज दर समान करण्याबाबत

**(१८) २१३२३ (१६-०८-२०१६). अ‍ॅड.राहुल नार्वेकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग : तारांकित प्रश्न क्रमांक १६७५० ला दिनांक २८ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बेस्ट, टाटा पॉवर व रिलायन्स इन्फ्राने या वीज कंपन्यांना ५०० युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या वीज ग्राहकांचे दर समान असावेत याबाबत शासनाने वीज कंपन्यांना प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाची अमंलबजावणी पूर्ण झाली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२७-१२-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात कृषी भवन उभारण्याबाबत

**(१९) २१३३९ (१२-०८-२०१६). अ‍ॅड.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांना नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती देण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात कृषी भवन उभारण्याची घोषणा कोल्हापूरचे पालकमंत्री महोदयांनी माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१०-०१-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) राज्याच्या कृषि विभागाच्या कार्यालयासंबंधी एकत्रित माहिती घेऊन ज्या कार्यालयांना शासकीय इमारत उपलब्ध नाही, अशा कार्यालयांना शासकीय इमारत उपलब्ध होण्यासाठी आवश्यक तो प्रस्ताव सादर करणेबाबत आयुक्त (कृषि) यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

महासंचालक, महाराष्ट्र राज्य कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांना प्रादेशिक गूळ संशोधन केंद्र, कोल्हापूर येथील जमीन कोल्हापूर जिल्ह्याच्या कृषि भवनास देणेबाबत तपासणी करुन त्याप्रमाणे जागा देणेबाबत निर्णय घेण्याचे शासन स्तरावरुन निर्देश दिलेले आहेत. जागा उपलब्ध झाल्यानंतर कृषि भवन उभारण्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बेस्टच्या वीज देयकात समाविष्ट असलेला वाहतूक विभागाचा अधिभार वगळण्याबाबत**

**(२०) २१८८२ (१६-०८-२०१६). श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेस्टच्या वीज देयकात समाविष्ट करण्यात आलेला वाहतूक विभागाचा अधिभार वगळण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२७-१२-२०१६) :** (१) बेस्ट उपक्रमामार्फत वित्तीय वर्ष २०१६-१७ ते २०१९-२० या प्रस्तावित बहूवार्षिक वीज दर याचिकेत महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दिनांक २८ ऑक्टोबर, २०१६ च्या याचिकेनुसार परिवहन विभाग तूट वसूली किंवा ट्रान्सपोर्ट डिव्हिजन लॉस रिकव्हरी (TDLR) वगळण्याबाबतचे आदेश निर्गमित केले आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मराठवाड्यातील खेळाडुंना सिंथेटीक ट्रॅकसाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत**

**(२१) २२१५४ (२३-०८-२०१६). श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यातील विभागीय क्रीडा संकुलावरील सिंथेटीक ट्रॅकसाठी मंजूर झालेला रुपये ५ कोटीचा निधी पब्लिक गॅलरीच्या बांधकामासाठी वापरला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शंभर, दोनशे आणि चारशे मिटर धावण्याच्या राष्ट्रीय स्पर्धा सिंथेटीक ट्रॅकवरच खेळण्याचा नियम असून सुध्दा मराठवाड्यातील खेळाडुंना मातीच्या ट्रॅकवर सराव करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, क्रीडा संकुलात खेळाडूंना राहण्यासाठी व्यवस्थित व्यवस्था नसुन सर्व खोल्या खराब झालेल्या आहेत व जेवणाचा दर्जा सुध्दा खराब असल्याने खेळाडूंचे आरोग्य धोक्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मैदानासाठी देण्यात आलेला निधी इतरत्र वळवणाऱ्यावर कारवाई करून सिंथेटीक ट्रॅकसाठी निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासन कार्यवाही करणार आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२८-१२-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) अंशत: खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) राज्यस्तर समितीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### मराठवाड्यातील विशेषत: औरंगाबाद जिल्ह्यातील ठिंबक सिंचनाचे अनुदान प्रलंबित असल्याबाबत

**(२२) २२१७० (१९-०८-२०१६). श्री.विक्रम काळे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले : तारांकित प्रश्न क्रमांक १६०९२ ला दिनांक २८ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाड्यातील शेतकऱ्यांचे निधी अभावी ठिंबक सिंचनाचे अनुदान तीन वर्षापासून प्रलंबित असून विशेषत: औरंगाबाद जिल्ह्यातील ठिंबक सिचंनाचे रूपये १३ कोटीचे अनुदान दोन वर्षापासून प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अनुदान थकीत ठेवण्याचे कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर ठिंबक सिंचनाचे थकीत असलेले अनुदान देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (२८-१२-२०१६) :** (१), (२) व (३) निधी अभावी सन २०१३-१४ या वर्षात शेतकऱ्यांकडून सूक्ष्म सिंचनाचे प्रस्ताव स्विकारण्यात आले नव्हते. तथापि, ज्या शेतकऱ्यांनी सन २०१३-१४ वर्षात सूक्ष्म सिंचन संच बसविले, अशा सर्व शेतकऱ्यांचे प्रस्ताव स्विकारुन त्यांना अनुदान देण्याचा निर्णय राज्य शासनाने जानेवारी, २०१५ मध्ये घेतला.

त्यानुसार, औरंगाबाद जिल्ह्यातील सन २०१३-१४ या वर्षातील रुपये २८.६८ कोटी एवढ्या रकमेचे ८३७१ पात्र अर्ज प्राप्त झाले. सन २०१३-१४ मधील प्रकरणांसाठी, सन २०१५-१६ या वर्षात ग्रामीण पायाभूत विकास निधी मालिका-२० अंतर्गत नाबार्डकडून उपलब्ध होणाऱ्या

कर्जासाठी राज्य शासनाने उपलब्ध करुन दिलेला निधी व डिपीसी मधून उपलब्ध निधी असा एकूण रुपये ३४५ कोटी एवढा निधी उपलब्ध झाला. त्यामधून औरंगाबाद जिल्ह्यासाठी रुपये १५.४१ कोटी एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात आला. सदर निधी ४५४९ अर्जदार शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात आला आहे. रुपये १३.२६ कोटी एवढ्या रकमेचे ३८२२ प्रस्ताव प्रलंबित आहेत.

निधी उपलब्धतेनुसार अनुदानाची रक्कम शेतकऱ्यांना वितरीत करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयातील टाकरखेडा, संभू येथून जवळच असलेल्या वायगाव ते आष्टी मार्गावर होत असलेली लाकूड तस्करी रोखण्याबाबत**

**(२३) २२१९३ (१९-०८-२०१६). श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील टाकरखेडा, संभू येथून जवळच असलेल्या वायगाव ते आष्टी मार्गावर रस्त्यांच्याकडेला कोलमडून पडलेल्या झाडांची तस्करी झाल्याचे माहे मार्च, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भांत शासनाने चौकशी करुन लाकूड तस्करी रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-१२-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र राज्य विद्यापीठाच्या पदवी व पदव्युत्तर परिक्षेत कॉपीचे प्रमाण वाढल्याबाबत**

**(२४) २२५३४ (२३-०८-२०१६). श्री.अरुणकाका जगताप :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र राज्य विद्यापीठाच्या माहे मे, २०१६ मध्ये घेण्यात आलेली पदवी व पदव्युत्तर परिक्षेत अहमदनगर शहरातील परिक्षा हॉलसह केंद्राच्या आवारात ठिकठिकाणी कॉपी करण्याचे प्रमाण वाढल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही बाब केंद्र संचालकाच्या निदर्शनास येऊनही कोणत्याच कॉपी बहाद्दरावर कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-०१-२०१७) :** (१) कॉफी करण्याचे प्रमाण वाढलेले नाही. अहमदनगर शाळातील तीन परीक्षा केंद्रावर अंदाजे ४००० इतके विद्यार्थी परीक्षेस बसले होते. ह्या विद्यार्थी संख्येचा विचार करता मे, २०१६ मध्ये ४९ विद्यार्थी गैरप्रकार करताना पकडण्यात आलेले आहेत.

(२) सदर विद्यार्थ्यांवर कारवाई करण्यासाठी विद्यापीठाने प्रमाद समितीची स्थापना केली असून त्याबाबतची कार्यवाही चालू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मिरा रोड (जि.ठाणे) येथील पेणकर पाडा मधील वसतिगृहाच्या बांधकामाबाबत**

**(२५) २२५७० (१९-०८-२०१६). श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा रोड (जि.ठाणे) येथील पेणकर पाडा मधील आदिवासी विद्यार्थी वसतिगृहाच्या इमारतीच्या बांधकामाचे भुमिपूजन माहे ऑगस्ट, २०१४ मध्ये मा.आदिवासी विकास मंत्री यांच्याकडून करण्यात येवून सदर बांधकामासाठी रुपये २० कोटी ४० लाख इतका निधी सन २०१४ मध्ये शासनाच्या आदिवासी विभागाने मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२८-१२-२०१६) :** (१) हे खरे नाही.

शासनाच्या दिनांक २०/०८/२०१४ च्या शासन निर्णयान्वये व शासन शुध्दीपत्रक दिनांक २५/०८/२०१६ अन्वये मिरा-भाईंदर, जि.ठाणे येथे १००० पैकी ३२८ क्षमतेचे मुलांचे वसतिगृह बांधकामासाठी रुपये २०,२१,०३,९१६/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर वसतिगृह इमारतीचे बांधकाम मिरा-भाईंदर महानगरपालिका करणार असल्याने महानगरपालिकेने ३ वेळा निविदा जाहिर केल्या असता अंदाजपत्रकातील दरापेक्षा ३८% जादा दराच्या निविदा प्राप्त झाल्यामुळे प्रशासकीय रकमेपेक्षा रुपये ७,६७,९९,४८८/- वाढीव रकमेची मागणी मिरा भाईंदर महानगरपालिकेने केलेली आहे.

सदर मुलांचे वसतिगृह इमारत बांधकामाचा कोणत्याही प्रकारचा निधी मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे वर्ग करण्यात आलेला नाही.

(२) व (३) महानगरपालिकेकडून सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यात काही त्रुटी असल्याने त्रुटीची पुर्तता करण्यासाठी मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडे दिनांक ०५/०७/२०१६ रोजी पाठविण्यात आले आहे.

---

**बीड जिल्हयात लाईनमनसह इतर तांत्रिक कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(२६) २२५८२ (१६-०८-२०१६). श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हयातील वीज वितरण व्यवस्थेत लाईनमनसह इतर तांत्रिक कर्मचाऱ्यांची ३२० पदे रिक्त असल्यामुळे महावितरणाच्या वीज वितरणात मोठया प्रमाणात अडथळे येऊन अनेक गावांत आठ ते दहा दिवस वीज पुरवठा होत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हयातील अनेक गावांत लाईनमन नसल्यामुळे कर्मचाऱ्यांची कामे ग्रामस्थ करत असल्यामुळे अनेक विद्युत प्राणांतिक अपघात होत असून मागील वर्षभरात अशा अपघातात २६ हून अधिक मनुष्यहानी झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार बीड जिल्हयातील लाईनमनसह इतर तांत्रिक कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२७-१२-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या एकूण ११३१ मंजूर पदांपैकी केवळ २२ रिक्त पदे आहेत. त्यामुळे त्यांची कामे ग्रामस्थ करतात अशी बाब नाही. २६ विद्युत अपघातांमध्ये मनुष्यहानी झालेली आहे.

(३) विद्युत अपघातांबाबत चौकशी सुरु आहे. तसेच रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सारसा (ता.जि.लातूर) येथील शेतकऱ्यास तांदुळजा येथील महाराष्ट्र ग्रामीण बॅंकेच्या शाखाधिकाऱ्याने पीक कर्ज नाकारल्याबाबत**

**(२७) २२८०७ (१६-०८-२०१६). श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सारसा (ता.जि.लातूर) येथे जिल्हाधिकारी यांनी आदेश देऊनही तांदुळजा महाराष्ट्र ग्रामीण बॅंकेच्या शाखा अधिकाऱ्यांने श्री.संपत भिसे या शेतकऱ्यास पीक कर्ज नाकारले असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शेतकऱ्याने मा.मुख्यमंत्री यांना पत्र लिहून आत्महत्येचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०३-०१-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर शेतकऱ्यास शाखा व्यवस्थापक, महाराष्ट्र ग्रामीण बँक, शाखा तांदुळजा यांना पीक कर्ज रक्कम रुपये ९८,०००/- दिनांक १२/०७/२०१६ रोजी मंजूर केले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### उस्मानाबाद जिल्हयात शेतकऱ्यांचे ठिंबक सिंचनाचे अनुदान प्रलंबित असल्याबाबत

**(२८) २३००३ (१२-०८-२०१६). श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हयात सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षातील ठिंबक सिंचन अनुदान रूपये १० कोटी ७४ लाखांची रक्कम लाभार्थी शेतकऱ्यांना अद्याप न मिळाल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शेतकऱ्यांचे प्रलंबित ठिंबक सिंचनाचे अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (२८-१२-२०१६) :** (१) उस्मानाबाद जिल्हयात सन २०१३-१४ या वर्षातील रुपये २७.३१ कोटी एवढ्या रकमेचे प्रस्ताव प्राप्त झाले होते. सदर प्रस्तावांसाठी सन २०१५-१६ या वर्षात रुपये १४.२२ कोटी एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. अजून रुपये १३.०९ कोटी एवढ्या रक्कमेचे प्रस्ताव प्रलंबित आहेत.

(२) निधी उपलब्ध झाल्यास प्रलंबित प्रस्ताव निकाली काढण्यात येतील.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्यातील तालुका स्तरावरील क्रीडा संकुलाच्या उभारणीसाठी तालुकास्तरावर क्रीडा संकुल समिती गठीत करण्याबाबत

**(२९) २३२१५ (२३-०८-२०१६). श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील तालुका स्तरावरील क्रीडा संकुलाच्या उभारणीसाठी तालुकास्तरावर क्रीडा संकुल समिती गठीत करण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात किती तालुका क्रीडा संकुल समिती गठीत झाल्या आहेत,

(३) असल्यास, ज्या तालुक्यातील क्रीडा संकुल समिती गठीत नाहीत अथवा समिती गठीत करणेस विलंब होत असल्यास त्याबाबतची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, किती कालावधीसाठी सर्व तालुक्यात क्रीडा संकुल समिती गठीत करण्यात आल्या आहेत, तसेच राज्यातील तालुकास्तरावरुन क्रीडा संकुलाचा सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (२८-१२-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) शासन निर्णय दिनांक २९/०२/२०१६ नुसार राज्यातील एकूण ३८० तालुका क्रीडा संकुलांपैकी २०६ तालुका क्रीडा संकुल समित्या गठीत झालेल्या असून १७४ तालुका क्रीडा संकुल समित्या गठीत करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच काही तालुक्यांमध्ये जागा उपलब्ध न होणे, न्यायालयीन प्रकरण इ. तांत्रिक कारणास्तव तालुका क्रीडा संकुल समिती गठीत करण्यास विलंब होत आहे.
(४) शासन निर्णयानुसार गठीत करण्यात आलेल्या समितीचे अस्तित्व कायमस्वरुपी आहे. समितीचे अध्यक्ष हे स्थानिक आमदार असून सदस्य शासकीय अधिकारी व कर्मचारी आहेत. त्यामुळे संकुल समिती कायमस्वरुपी असून फक्त त्यावर नियुक्ती केलेली व्यक्ती कालपरत्वे बदलत राहील.

---

### राज्यातील अनुसूचित जाती/जमातीतील लाभार्थ्यांना घरकुल देण्याबाबत

**(३०) २३५०२ (१५-११-२०१६). श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अनिल भोसले, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.प्रकाश गजभिये, श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अनुसूचित जाती/जमातीतील प्रत्येक लाभार्थ्यास सन २०१९ पर्यंत घरकुल देण्याचा निर्णय माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर लाभार्थ्यांची संख्या किती आहे व प्रतिवर्षी किती लाभार्थ्यांना घरकुले देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे,
(३) असल्यास, उपरोक्त योजनेसाठी किती रक्कमेची तरतूद केली आहे व योजना पूर्ण होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२९-११-२०१६) :** (१) केंद्र शासनाने "सर्वांसाठी घरे २०२२" असे धोरण निश्चित केले आहे. सन २०१६-१७ पासून केंद्र शासनाने इंदिरा आवास योजनेचे स्वरूप बदलून प्रधान मंत्री आवास योजना (ग्रामीण) राबविण्याचा निर्णय घेतला आहे.
(२) प्रधान मंत्री आवास योजनेंतर्गत सन २०१६-१७ साठी अनुसूचित जातीसाठी व अनुसूचित जमातीसाठी प्रत्येकी ५१३१५ घरकुलांचे जिल्हानिहाय उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे तसेच केंद्र शासनाने निश्चित केलेल्या सर्वांसाठी घरे या संकल्पनेवर आधारीत मार्गदर्शक सूचनांनुसार रमाई आवास योजना (ग्रामीण) करिता सन २०१६-१७ या वर्षात एकूण ५०,००० घरकुलांचा लाभ देण्याचे उद्दिष्ट शासनाने निश्चित केले असून ४३३० लाभार्थींना मंजूरी देण्याची प्रक्रिया सुरु आहे. अनुसूचित जमातीसाठी असलेल्या शबरी आदिवासी घरकुल योजनेचे सन २०१६-१७ या वर्षात १४००० घरकुलांचा लक्षांक निश्चित करण्यात आला आहे.

(३) सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाकरिता रमाई आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत रुपये ३२०००.००/- लक्ष एवढी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आलेली आहे. शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. रआयो-२०१६/प्र.क्र.५७८/बांधकामे, दिनांक ३०/०९/२०१६ अन्वये सदर योजनेत केलेल्या सुधारणेनुसार लाभार्थी निवड प्रक्रिया करणेबाबत आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांच्याकडून सर्व संबंधितांना सूचना देण्यात आल्या आहेत.

तसेच सदर योजनेची प्रभावी अमंलबजावणी व सनियंत्रण करण्यासाठी शासनाने "राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण" असा स्वतंत्र कक्ष तयार केला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात सार्वजनिक स्थळी महिलांसाठी शौचालये उभारण्याबाबत**

**(३१) २३५२४ (१५-११-२०१६). श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.आनंद ठाकूर : तारांकित प्रश्न क्रमांक ४२५० ला दिनांक २६ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महिलांसाठी सार्वजनिक स्थळी महिलांसाठी पुरेश्या प्रमाणात शौचालये नसल्याने देशभर चळवळ उभारण्याचा निर्णय माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात महिलांसाठी सार्वजनिक स्थळी शौचालये उभारुन त्यांची देखभाल करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (३०-११-२०१६) :** (१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बोईसर (जि.पालघर) येथील तारापूर एमआयडीसीमधील अग्निशमन केंद्रामध्ये सोईसुविधांचा अभाव असल्याबाबत**

**(३२) २३५८६ (१०-११-२०१६). श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **उद्‌योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोईसर (जि.पालघर) येथील तारापूर एमआयडीसीमध्ये असलेल्या अग्निशमन केंद्रामध्ये सोई सुविधांचा अभाव असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर एमआयडीसीमध्ये नियमानुसार साठ पेक्षा अधिक अग्निशमन कर्मचाऱ्यांची आवश्यकता असताना केवळ चोवीस कर्मचारी असून त्यांना दिली जाणारी सामग्री देखील निकृष्ठ दर्जाची असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२८-११-२०१६) :** (१) व (२) हे खरे नाही.

केंद्र शासनाच्या केंद्रिय स्थायी सल्लागार समितीने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार तारापूर औद्योगिक क्षेत्रात अग्निशमन केंद्रासाठी एकूण २८ पदे मंजूर करण्यात आलेली असून त्यापैकी, २४ पदे भरलेली आहेत व उर्वरित रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया महामंडळामार्फत चालू आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत सदर औद्योगिक क्षेत्रातील अग्निशमन केंद्रासाठी उपलब्ध करुन देण्यात येणारी यंत्र सामुग्री ही निकृष्ट दर्जाची असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सामाजिक न्याय विभागाच्या अखत्यारीतील इमारतीवर बसविण्यात येणाऱ्या वीज अटकाव यंत्र खरेदीत गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(३३) २३९७१ (११-११-२०१६). श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय विभागाच्या अखत्यारीतील इमारतींवर वीज अटकाव यंत्रणा बसवणेबाबत सामाजिक न्याय विभागाने दिनांक २० ऑगस्ट, २०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महसूल व वन विभागाच्या ज्या शासन निर्णयान्वये ही खरेदी करण्यात आली तो शासन निर्णयच महसूल व वन विभागाने निर्गमित केला नव्हता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सामाजिक न्याय विभागाप्रमाणेच शासनाच्या इतर विभागानेही या बनावट शासन निर्णयाचा आधार घेऊन खरेदी केली, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्‌नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२९-११-२०१६) :** (१) होय.

(२) नाही.

वीज पडून होणाऱ्या मृत्यूंचे प्रमाण कमी करण्यासाठी उपाययोजना म्हणून वीज अटकाव यंत्रणा उभारण्याबाबत शासन निर्णय, महसूल व वन विभागाने दिनांक ९ मे, २००८ रोजी निर्गमित केला आहे.

(३) महसूल व वन विभागाचा सदरहू शासन निर्णय बनवाट नसल्याने सामाजिक न्याय विभागाप्रमाणे इतर विभागांनीही सदर शासन निर्णयाचा आधार घेऊन वीज अटकाव यंत्रणा खरेदी केली असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील विशेषत: मुंबईतील विद्यार्थ्यांना वाचनासाठी**
**व्दिभाषिक पुस्तके उपलब्ध न झाल्याबाबत**

**(३४) २४१६७ (१९-११-२०१६). प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: मुंबईतील विद्यार्थ्यांना वाचनासाठी व्दिभाषिक पुस्तके उपलब्ध न झाल्याने या पुस्तकांच्या खरेदीलाच स्थगिती देण्याचा महत्वपूर्ण निर्णय महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेतर्फे (विद्या परिषद) माहे ऑक्टोबर, २०१६ च्या दुसऱ्या आठवड्यात घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेसाठी निवडण्यात आलेल्या प्रकाशकांनी १२ कोटी रुपयांहून अधिक पुस्तके छापण्यात आली असून सदर योजनेस स्थगिती दिल्यामुळे प्रकाशकांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास मुंबईसह राज्यातील मोजक्याच शाळांना ही पुस्तके उपलब्ध झाली असून अनेक शाळांना या पुस्तक खरेदीचा निधी न मिळाल्यामुळे पुस्तके खरेदी करता आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रकाशकांचे नुकसान टाळण्याकरीता सदर योजना सुरु करण्याबाबत तसेच निधीस विलंब लावणाऱ्या कर्मचाऱ्यांवर व अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व ही पुस्तके कधीपर्यंत शाळांना प्राप्त होणे अपेक्षित आहे ?

**श्री. विनोद तावडे (०७-१२-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) सदर खरेदीमध्ये स्थानिक पातळीवर गैरप्रकार होत असल्याचे निदर्शनास आल्याने शासनाच्या दिनांक १७/११/२०१६ च्या पत्रान्वये द्विभाषिक पुस्तकांची खरेदी पुढील आदेश होईपर्यंत थांबविण्यात आली आहे.

---

**केंद्र शासनाकडून देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीत गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(३५) २४३१६ (११-११-२०१६). ॲड.अनिल परब : तारांकित प्रश्न क्रमांक २१००३ ला दिनांक ०५ ऑगस्ट, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्राकडून राज्यातील दलित आणि मागासवर्गीय विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीपैकी ३० ते ५० टक्के रक्कमेचा शिक्षण संस्था चालकांनी गैरव्यवहार केल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले व त्यानुषंगाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२८-११-२०१६) :** (१) व (२) केंद्र शासनाच्या मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती वाटपात राज्यात गैरव्यवहार झाला किंवा कसे याबाबबत गृह विभागामार्फत झाला किंवा कसे याबाबत गृह विभागामार्फत अप्पर पोलीस महासंचालक (प्रशिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली एक विशेष चौकशी पथक स्थापन करण्यात आले असून, सदर पथकामार्फत अद्याप चौकशी सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अनेक शाळा विद्यार्थ्यांकडून जादा शुल्क आकारत असल्याबाबत**

**(३६) २४६०८ (१९-११-२०१६). श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर : तारांकित प्रश्न क्रमांक १२८३० ला दिनांक १४ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक शाळा आजही विद्यार्थ्यांकडून प्रचंड फी आकारत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात जादा शुल्क आकारणाऱ्या शाळांवर कारवाईचे आदेश शिक्षण विभागाने दिले असतानाही शाळा आणि शिक्षण अधिकारी दुर्लक्ष करीत असल्यामुळे अनेक शाळा विद्यार्थ्यांकडून जादा शुल्क आकारित असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, पालकांनी शुल्क वाढीचा प्रश्नाबाबत राज्यस्तरीस समिती नेमण्याची मागणी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शुल्क वाढीचा प्रश्न निकाली काढण्याबाबत तसेच शुल्क वाढ करणाऱ्या शाळांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०७-१२-२०१६) :** (१), (२), (३) व (४) महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम २०११ अंतर्गत राज्यस्तरीय पुनरीक्षण समिती व विभागीय शुल्क समित्या गठीत करण्यात आल्या आहेत. सदर समित्यांमार्फत जादा शुल्क आकारणाऱ्या शाळांच्या तक्रारीबाबत कारवाई होणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे येथील ऐतिहासिक वास्तु असलेल्या वाडया पुनर्विकासापासून वंचित असल्याबाबत**

**(३७) २४७९६ (१६-११-२०१६). श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे मधील ऐतिहासिक वास्तु म्हणून असलेले वाडयांची दुरवस्था झाली असून पुनर्विकासापासून वंचित राहिले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या धोकादायक वाडयांचा पुनर्विकास करण्याबाबत शासनाने धोरण ठरवून त्यानुसार वाडयांचा पुनर्विकास करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (३०-११-२०१६) :** (१) नाही.

पुण्यातील ऐतिहासिक वास्तु असलेल्या वाड्या पुनर्विकासापासून वंचित असल्याचे कोणतेही निवेदन अथवा पत्र आलेले नाही.

(२) १. पुण्यातील शनिवारवाडा ही वास्तु केंद्र संरक्षित असून केंद्रीय पुरातत्त्वीय विभागामार्फत दुरुस्तीचे काम करण्यात आले आहे.
२. पुण्यातील महात्मा फुले वाडा व विश्रामबाग वाडा, हे राज्य संरक्षित असून राज्य पुरातत्त्वीय विभागामार्फत दुरुस्तीचे काम करण्यात आले आहे.
३. पुणे मनपाच्या ऐतिहासिक वारसा यादीतील पुणे मनपाच्या मालकीच्या वास्तुंचे पुणे मनपामार्फत दुरुस्तीचे काम करण्यात येते.
४. पुणे मनपाच्या ऐतिहासिक वारसा यादीतील खाजगी मालकीच्या वास्तुंच्या जतन दुरुस्तीचे काम खाजगी मालकाने करणे आवश्यक आहे. त्यांच्या पुनर्विकासाचे काम शासन किंवा मनपामार्फत केले जात नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आश्रमशाळांतील शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी आदिवासी शिक्षण आयोगाची स्थापना करण्याबाबत

**(३८) २४८०० (१०-११-२०१६). श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या आदिवासी विकास विभागाकडून शिक्षणासाठी निधी खर्च होऊनही आश्रमशाळांतील शिक्षणाचा दर्जा घसरल्याने विद्यार्थी गळतीचे प्रमाण वाढले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासी भागात शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी आदिवासी शिक्षण आयोगाची स्थापना करण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२८-११-२०१६) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला जिल्ह्यातील अनुसूचित जाती, ओबीसी, व्हीजे एनटी, विशेष मागास संवर्गातील विद्यार्थ्यांचे फ्री-शीप सवलतीचे अर्ज पाठविण्यास महाविद्यालयांनी केलेला विलंब**

**(३९) २४८८३ (१०-११-२०१६). श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील अनुसूचित जाती, ओबीसी, व्हीजे-एनटी आणि विशेष मागास (एस.बी.सी) संवर्गातील ९०२२ विद्यार्थ्यांनी मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती-फ्री शीप सवलतीसाठी केलेले अर्ज संबंधित महाविद्यालयांनी मुदतीत पाठविले नसल्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीची रक्कम व्यपगत होणार असल्याचे दिनांक १ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२८-११-२०१६) :** (१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर येथील समाजकार्य महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांना नियमित वेतन मिळणेबाबत**

**(४०) २५२२४ (१०-११-२०१६). प्रा.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील समाजकल्याण सहाय्यक आयुक्त या विभागांतर्गत असलेली नागपूर जिल्ह्यातील समाजकार्य महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांचे दोन ते तीन महिने विलंब होऊनही वेतन मिळत नसल्याचे दिनांक २६ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२८-११-२०१६) :** (१) होय.

(२) सामाजिक न्याय विभागांतर्गत एकूण ५२ समाजकार्य महाविद्यालय कार्यरत आहेत. राज्यात समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या वेतनासाठी सन २०१६-१७ आर्थिक वर्षात एकूण ८१ कोटी ०६ लाख ५२ हजार इतकी तरतूद अर्थसंकल्पित आहे.

नागपूर जिल्ह्यात सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, नागपूर यांचे अंतर्गत एकूण ११ समाजकार्य महाविद्यालय कार्यरत आहेत. सन २०१६-१७ मध्ये वेतनाचा निधी माहे मे, २०१६ मध्ये प्राप्त झाल्याने मार्च व एप्रिल ची वेतन देयके प्रलंबित होती. तसेच समाज सेवार्थ प्रणालीमध्ये मागील महिन्याचे देयक मंजूर झाल्याशिवाय पुढील महिन्याची देयके प्रणाली स्विकारत नसल्याने वेतन देयके सादर करण्यास विलंब झालेला आहे.

सद्यस्थितीत नियमित वेतन देण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर येथील शालेय पोषण आहारांतर्गत विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या तांदळाची खुल्या बाजारात विक्री होत असल्याबाबत**

**(४१) २५२३० (१६-११-२०१६). प्रा.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील शालेय पोषण आहारांतर्गत विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या तांदळाची खुल्या बाजारात विक्री होत असल्याचे दिनांक ४ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व संबंधित दोषीवर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०३-१२-२०१६) :** (१) व (२) शालेय पोषण आहार योजनेचा तांदूळ शिक्षक घरी नेत असल्याबाबतची बातमी वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झालेली होती. तथापि, याबाबत चौकशी केली असता, सदर प्रकार चोरीचा नसल्याचे आढळून आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्त्याबाबत**

**(४२) २५७७५ (१६-१२-२०१६). डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक २१६९२ ला दिनांक २१ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचारी/अधिकाऱ्यांच्या वेतन व भत्त्याचे दायित्व शासनाने स्वीकारण्यासंबंधीचा प्रस्ताव मा.मंत्रीमंडळापुढे सादर करण्याची चालू असलेली कार्यवाही पुर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावास मा.मंत्रीमंडळाने मान्यता प्रदान केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, उक्त प्रकरणी कार्यवाही केव्हापर्यंत पुर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्री. बबनराव लोणीकर (०४-०१-२०१७) :** (१) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचारी/अधिकाऱ्यांच्या वेतन व भत्त्याचे दायित्व शासनाने स्विकारण्याबाबतचा प्रस्ताव मा.मंत्रीमंडळापुढे ठेवण्यासाठी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागामार्फत सादर करण्यात आला आहे.

पाणीपुरवठा व स्वच्छता विभागामार्फत सादर केलेल्या प्रस्तावावर मा.मंत्रीमंडळापुढे प्रस्ताव सादर करण्याच्या कार्यपध्दतीत समाविष्ट असलेल्या विभागांकडून उपस्थित केलेल्या मुद्यांची पुर्तता करुन प्रस्ताव मा.मंत्रीमंडळापुढे ठेवण्यासाठी फेरसादर करण्यात आलेला आहे.

(२) व (३) अद्याप मा.मंत्रीमंडळापुढे प्रस्ताव ठेवण्यात आलेला नाही. मा.मंत्रीमंडळापुढे प्रस्ताव ठेवण्यासाठी आवश्यक ती मान्यता/अभिप्राय आवश्यक असणाऱ्या विभागांकडून प्राप्त झाल्यावर पुढील कार्यवाही होणे अपेक्षित आहे.

---

**राज्यातील शहरांमध्ये तसेच ग्रामीण भागातील वायू प्रदूषणाची परिस्थिती अत्यंत गंभीर असल्याबाबत**

**(४३) २५८३९ (१९-११-२०१६). श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शहरांमध्ये वायू प्रदूषणांची परिस्थिती अत्यंत गंभीर असून ग्रामीण भागातील वातावरण हि चिंताजनक असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वायू प्रदूषण कमी करण्यासाठी रस्त्यावर वाहनांच्या संख्येवर नियंत्रण, कचरा व्यवस्थापन सुधारणा आणि भोजनासाठी स्वच्छ इंधन पुरविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (०७-१२-२०१६) :** (१) अंशत: हे खरे आहे.

(२) वरील बाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे १७ महानगरपालिका आयुक्त, जिल्हाधिकारी यांना हवा प्रदूषण (प्रतिबंधव नियंत्रण) कायदा १९८१ अंतर्गतच्या कलम ३१ अ अन्वये निर्देश देण्यात आलेले आहेत व त्याची अंमलबजावणी प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वसई तालुक्यातील (जि.पालघर) जिल्हा परिषदेच्या शाळांच्या इमारती धोकादायक झाल्याबाबत**

**(४४) २५८६९ (११-११-२०१६). श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई तालुक्यातील (जि.पालघर) जिल्हा परिषदेच्या सुमारे १७ शाळांच्या इमारती धोकादायक असल्याने येथील विद्यार्थ्यांचे जीवन धोक्यात आल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शाळांचे स्ट्रक्चरल ऑडिट करुन या धोकादायक इमारतीतील विद्यार्थ्यांना पर्यायी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०३-१२-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.

वसई तालुक्यातील (जि.पालघर) जिल्हा परिषदेच्या २ शाळांच्या इमारती धोकादायक आहेत.

(२) सदर २ शाळा इमारती पाडण्याच्या कार्यवाहीबाबत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना कळविले आहे. या २ शाळांमधील विद्यार्थ्यांची अध्यापनाची सोय अन्य ठिकाणी केली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत**

**(४५) २५९०२ (१०-११-२०१६). श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील अग्निशमन विभागातील कर्मचा-यांनी दिनांक १९ ऑक्टोबर, २०१६ पासून संप पुकारला होता, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, कर्मचाऱ्यांवर होणाऱ्या अन्यायाबाबत वारंवार अर्ज-विनंत्या करुनही प्रशासनाने कोणताही सकारात्मक प्रतिसाद न दिल्याने रयतराज कामगार संघटनेच्या नेतृत्वाखाली दिनांक १९ ऑक्टोंबर, २०१६ रोजी पासून मुंबई येथील आझाद मैदान येथे संप व आंदोलन केले आहे, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२८-११-२०१६) :** (१) व (२) हे खरे नाही.

तथापि, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्यांनी महामंडळाची मान्यता नसलेल्या रयतराज या कामगार संघटनेमार्फत त्यांच्या विविध मागण्यांसाठी दिनांक १९ ऑक्टोबर, २०१६ पासून संप पुकारणार असल्याबाबत महामंडळास नोटीस दिली होती.

त्याअनुषंगाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने महामंडळाची अग्निशमन सेवा ही अत्यावश्यक सेवा घोषित करण्यासंबंधिचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला होता. त्यास अनुसरुन महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षा अधिनियम २०११ मधील तरतूदीनुसार महामंडळाची अग्निशमन सेवा ही अत्यावश्यक सेवा म्हणून जाहिर करण्यासंबंधीची अधिसूचना दिनांक १८/१०/२०१६ रोजी शासन राजपत्रात प्रसिध्द केलेली आहे, त्यामुळे अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्यांमार्फत दिनांक १९ ऑक्टोबर, २०१६ रोजी पुकारलेला संप त्यांनी दिनांक १८ ऑक्टोबर, २०१६ रोजी मागे घेतला आहे.

(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**सोलापूर जिल्ह्यात शासनाच्या जाचक नियमामुळे जात पडताळणी प्रमाणपत्र मिळण्यास विलंब होत असल्याबाबत**

**(४६) २६०७४ (१०-११-२०१६). श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यात जात पडताळणीसाठी आवश्यक ती सर्व कागदपत्रे असतानाही शासनाच्या जाचक अटींमुळे जात प्रमाणपत्र मिळण्यास विलंब होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन येथील नागरीकांना जात पडताळणी प्रमाणपत्र सुलभपणे मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२८-११-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात अनुसूचित जाती-जमातींच्या आश्रमशाळांना अनुदान देण्याबाबत**

**(४७) २६०८३ (१०-११-२०१६). श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनुसूचित जाती-जमातींच्या मुला-मुलींसाठी सुरु केलेल्या २८८ आश्रमशाळांच्या अनुदानाचा प्रश्न मागील १६ वर्षे प्रलंबित असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे केंद्रचालक कर्जबाजारी झाले असून मागील अनेक वर्षापासून शिक्षक विनावेतन काम करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने निर्णय घेऊन सदर आश्रमशाळांना अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२९-११-२०१६) :** (१) व (२) केंद्र पुरस्कृत आश्रम शाळेची योजना ही सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय भारत सरकार यांची असून अनुसूचित जातीच्या मुलामुलींकरिता निवासी अनिवासी प्राथमिक/माध्यमिक आश्रमशाळांना या योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून ९० टक्के व स्वयंसेवी संस्थेच्या १० टक्के हिस्सा या सूत्रानुसार सहायक अनुदान दिले जाते. या योजनेंतर्गत सुमारे ३२२ आश्रमशाळांना राज्य शासनाची कायम विना अनुदान तत्वावर मान्यता देण्यात येऊन त्यांचे प्रस्ताव केंद्र शासनास शिफारस करण्यात आले होते. तथापि, राज्याकडून मोठ्या प्रमाणात प्रस्ताव केंद्र शासनास पाठविण्यात आल्याने निधी उपलब्धतेनुसार यापैकी फक्त ३४ आश्रमशाळांना केंद्र शासनाकडून अनुदान देण्यात येत आहे. उर्वरीत आश्रमशाळांना अनुदान देण्याबाबत केंद्र शासनाकडून कार्यवाही करण्यात आलेली नाही. सबब, सदरहू आश्रमशाळांना राज्य शासनाचे अनुदान मंजूर करण्याबाबत विविध संस्थाचालक / लोकप्रतिनिधींकडून निवेदने शासनास प्राप्त झालेली आहेत.

(३) सदर आश्रमशाळांना अनुदान देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील “महाजनको” च्या चंद्रपूर, कोराडी, खापरखेडा, पारस, परळी, नाशिक आणि भुसावळ औष्णिक विद्युत प्रकल्पांमधील अनेक संच बंद झाल्याबाबत**

**(४८) २६१५६ (१०-११-२०१६). श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील “महाजनको” च्या चंद्रपूर, कोराडी, खापरखेडा, पारस, परळी, नाशिक आणि भुसावळ या औष्णिक विद्युत प्रकल्पांमधील अनेक संच विविध कारणांमुळे बंद असल्याने वीज निर्मितीवर प्रतिकूल परिणाम होत असल्याचे माहे ऑगस्ट-२०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२८-११-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अग्निहोत्री ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन, वर्धा अंतर्गत येणाऱ्या महाविद्‌यालयांनी महाविद्‌यालयांत बोगस मागासवर्गीय विद्‌यार्थ्यांना प्रदेश दिल्याबाबत**

**(४९) २६१६५ (१०-११-२०१६). प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अग्निहोत्री ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन, वर्धा अंतर्गत येणाऱ्या महाविद्‌यालयांमध्ये बोगस मागासवर्गीय विद्‌यार्थ्यांना प्रवेश देण्यात येत असून सन २०१० ते २०१६ या कालावधीत ओ.बी.सी. विद्‌यार्थ्यांना एस.सी. वर्गवारीमध्ये दाखवून शिष्यवृत्तीचा लाभ घेतल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त महाविद्‌यालयामध्ये मागासवर्गीय विद्‌यार्थ्यांना प्रवेश देतांना शुल्क आकारण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात आली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजकुमार बडोले (२८-११-२०१६) :** (१) नाही.
(२) नाही.
(३) केंद्र शासनाच्या मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती वाटपात राज्यात गैरव्यवहार झाला किंवा कसे याबाबत गृह विभागामार्फत अप्पर पोलीस महासंचालक (प्रशिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली एक विशेष चौकशी पथक स्थापन करण्यात आले असून, सदर पथकामार्फत चौकशी सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अल्पसंख्याक शिक्षक वेतनापासून वंचित राहणार असल्याबाबत**

**(५०) २६२८६ (१९-११-२०१६). श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नवीन शाळांना मान्यता देण्यात आल्यामुळे विद्यार्थ्यांची संख्या कमी झाल्याने शिक्षक सरप्लस होणार आहेत व दिनांक १३ जुलै, २०१६ च्या शासन निर्णयानुसार अल्पसंख्याक शिक्षक वेतनापासून वंचित राहणार आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १३ जुलै, २०१६ च्या शासन निर्णयानुसार अल्पसंख्याक शिक्षकांवर अन्याय होणार नाही यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०७-१२-२०१६) :** (१) व (२) हे खरे नाही.

तथापि अल्पसंख्यांक संस्थामधील अतिरिक्त शिक्षकांचे त्याच अल्पसंख्याक संस्थांच्या शाळेमध्ये रिक्त पदावर समायोजन करण्यात येईल, हे शक्य न झाल्यास इतर अल्पसंख्यांक संस्थेमध्ये संस्थेच्या इच्छेनुसार रिक्त पदावर समायोजन करण्यात येईल, हे ही शक्य न झाल्यास त्यांचे समायोजन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळेतील रिक्त पदांवर करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**उत्तमसिंग चव्हाण**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण : शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.